नवीन पदे निर्माण करणे व रिकाम्या जागा भरणे यावरील बंदी.

---

नाईक पदासाठी सूट देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक: चवक १०८९/सीआर १३१/सेवा-८,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १२ फेब्रुवारी, १९९०.

<u>पहा</u>:- [१] शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. सीएफएल १४७७/सीआर ५७७/सेवा-७, दिनांक १५ नोव्हेंबर १९७८.
[२] शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: बीजीटी २५८६/सीआर-४/आरईएस-५, दिनांक १७ मे, १९८६.
[३] शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: चवक १०८८/सीआर १८३/सेवा-८, दिनांक ६ एप्रिल, १९८८.
[४] शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: चवक १०८८/सीआर २७१/सेवा-८, दिनांक २१ नोव्हेंबर, १९८८.

<u>शासन निर्णय</u> :- शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: चवक १०८८/सीआर २७१/सेवा-८, दिनांक २१ नोव्हेंबर १९८८ मधील आदेशान्वये सध्या नाईक पदावर करावयाच्या नेमणुका त्या विभाग प्रमुखांच्या अखत्यारीत असलेल्या सर्व शिपायांच्या एकत्रित ज्येष्ठते-नुसार करण्यात येतात. त्या आदेशांची अंमलबजावणी करण्यामध्ये काही प्रशासकीय अडचणी येतात असे निदर्शनास आले आहे. याचा विचार करून व या आदेशांचे अधिक्रमण करून, शासन असा आदेश देत आहे की, शिपाई पदांच्या संख्येच्या आधाराने नाईक पदांची संख्या ठरविण्यासाठी प्रत्येक विभाग प्रमुखांच्या अखत्यारीतील शिपायांच्या पदांच्या संख्येऐवजी, यापुढे प्रत्येक "नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या" अखत्यारीतील पदांची संख्या विचारात घेण्यात यावी व नाईक पदावर करावयाच्या नेमणुका नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या अखत्यारीत असल्यामुळे त्या नेमणुका यापुढे "नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या" अखत्यारीतील सर्व शिपायांच्या एकत्रित ज्येष्ठता सूचीप्रमाणे करण्यात याव्यात.

२. या शासन निर्णयाच्या परिच्छेद-१ प्रमाणे सुधारण्यात आलेल्या शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: चवक १०८८/सीआर १८३/सेवा-८, दिनांक ६ एप्रिल, १९८८ च्या परिच्छेद १[एक] संबंधात असा खुलासा करण्यात येतो की, "नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या" अखत्यारीत शिपायांची ३ किंवा जास्त पदे उपलब्ध असल्यास व शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: सीएफएल १४७७/सीआर ५७७/सेवा-७, दिनांक १५ नोव्हेंबर, १९७८ अन्वये त्यातील एका पदाची, नाईकाचे पदात, श्रेणीवाढ <u>करावयाची झाल्यास अशा</u> श्रेणीवाढीसाठी <u>सुध्दा मंत्रिमंडळाच्या मान्यतेची आवश्यकता असणार नाही.</u>

३. शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक ६ एप्रिल १९८८ मधील बाकीच्या सर्व <u>अटी तशाच राहतील.</u>

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी
2 2 FEB 1990
शाखा - ...
नि. स. जि. जिल्हाधिकारी

कृ. मा. प.

शा. म. मु. रत्ना/एन-११९९[१०,००० + १०-२-९०]

४. अशाच प्रकारचे जिल्हा परिषदांबाबतचे आदेश हे ग्राम विकास विभागातर्फे काढण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ. मा. कुलकर्णी,
शासनाचे उप सचिव,
वित्त विभाग.

प्रति,

महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
* प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
* प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
मंत्रालयातील सर्व विभाग,
निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई,
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन सेवा-८.

---

* पत्राद्वारे

************